# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४३/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
ई-मेल :- sec.corp@mah.gov.in
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०२५.

प्रति,-
आयुक्त,
सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून)

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०२५
आरक्षण निश्चिती व सोडत कार्यक्रमाबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.७/का-५, दि. १६/०६/२०२५ चे आदेश व दि. ३०/०७/२०२५ ची सुधारणा.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४३/का-५, दि. २४ ऑक्टोबर, २०२५

महोदय,

मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दि.१६/०९/२०२५ रोजी दिलेल्या निदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही दि. ३१ जानेवारी, २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५-अ नुसार आरक्षणास मान्यता देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे आहेत.

३. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्रमांक क्र.एमसीओ-२०२४/ प्र.क्र.१८१/नवि-१४, दि. २० मे, २०२५ अन्वये चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणुका घेण्याकरीता “महाराष्ट्र महानगरपालिका (प्रभागांमध्ये राखीव जागांचे वाटप करणे आणि त्या जागा चक्रानुक्रमे फिरविण्याची पध्दत) नियम, २०२५” निर्गमित केले असून त्यानुसार आरक्षण

चक्रानुक्रमे फिरविण्याच्या प्रयोजनार्थ आगामी होणारी निवडणूक ही पहिली निवडणूक म्हणून ग्राह्य धरण्याबाबत तरतूद केली आहे.

४. महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई वगळून) आगामी सार्वत्रिक निवडणुकांकरीता आरक्षित जागांची संख्या निश्चित करणे व त्या जागांचे संबंधित प्रभागांमध्ये वाटप करण्याच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये सविस्तर सूचना जारी केल्या आहेत. सदर आदेश व उपरोक्त नियमातील तरतुदी विचारात घेऊन महानगरपालिकांमध्ये आरक्षित जागांची संख्या निश्चित करणे व त्या जागा संबंधित प्रभागांमध्ये वाटप करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**अ) महानगरपालिकेतील आरक्षित जागांची संख्या निश्चित करून त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेणे :-**

आरक्षित जागांची संख्या निश्चित करून त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याकरीता दि. २४/१०/२०२५ रोजीच्या आदेशातील खालील कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावा.

१) अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना
२) संदर्भाधिन आदेशाच्या परिशिष्ट - १ मधील सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना
३) संदर्भाधिन आदेशाच्या परिशिष्ट - २ मधील अनुसूचित जातीचा उतरता क्रम
४) संदर्भाधिन आदेशाच्या परिशिष्ट - ३ मधील अनुसूचित जमातीचा उतरता क्रम
५) संदर्भाधिन आदेशाच्या परिशिष्ट - ४ मधील सदस्य संख्या व आरक्षणाचे एकत्रित विवरणपत्र

यामध्ये उतरत्या क्रमाने देय होणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या जागा तसेच दि. २० मे, २०२५ च्या नियमातील तरतुदीनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता देय जागांपैकी थेट देय होणाऱ्या जागा नमूद करण्यात याव्यात.

६) संदर्भाधिन आदेशाच्या परिशिष्ट - ८ मधील सोडतीच्या इतिवृत्ताचा नमूना

सोडतीच्या नमुना इतिवृत्तामध्ये महानगरपालिकेमध्ये आरक्षित जागा देय होणाऱ्या प्रभागांचे जागा क्र. इत्यादी तपशिल दर्शवून दि. २० मे, २०२५ च्या नियमातील तरतुदीनुसार सोडत कशाप्रकारे काढण्यात येईल याबाबतची कार्यपध्दती दर्शविण्यात यावी.

ब) जाहिर सूचना देणे :-

राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणास मान्यता दिल्यानंतर आरक्षित जागांची सोडत काढण्याकरीता जाहिर सूचना द्यावी. याकरीता राज्य निवडणूक आयोगाने दि. २४/१०/२०२५ रोजीच्या आदेशाच्या **परिशिष्ट - ५ व ६** मध्ये जाहिर सूचनेचे नमुने दिले आहेत. तसेच आदेशाच्या परिच्छेद - ११ मध्ये दिल्यानुसार सोडतीला व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक आहे.

क) आरक्षित जागा निश्चित करण्याकरीता सोडत काढणे :-

सोडत काढण्याकरीता असलेली मार्गदर्शक तत्वे संदर्भाधिन आदेशाच्या **परिशिष्ट- ७** मध्ये विहित केलेली आहे. त्याचा अवलंब करुन सोडत काढण्यात यावी. तसेच **परिशिष्ट- ८** मध्ये इतिवृत्ताचा नमूना दिलेला आहे. आवश्यकतेनुसार त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करुन सोडतीचे इतिवृत्त तयार करावे. **सोडतीचा निकाल परिशिष्ट- ९ मध्ये दिलेल्या नमून्यात राज्य निवडणूक आयोगाकडे तात्काळ पाठविण्यात यावा व त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात यावी.**

ड) प्रारुप आरक्षणास प्रसिध्दी देऊन हरकती व सूचना मागविणे :-

राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास **परिशिष्ट - १०** मधील नमुन्यात आरक्षित जागांचा तपशिल जाहिर करुन त्यास आदेशाच्या परिच्छेद ११ मध्ये नमूद केल्यानुसार योग्य ती प्रसिध्दी द्यावी. आदेशाच्या परिच्छेद १२ नुसार हरकती व सूचना दाखल करुन घेण्याची कार्यवाही करावी.

इ) प्राप्त हरकती व सूचनांवर विचार करुन निर्णय घेणे :-

संदर्भाधिन आदेशाच्या परिच्छेद १३ मध्ये नमूद केल्यानुसार प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर **परिशिष्ट- ११** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात हरकतीचे स्वरूप, त्या संदर्भातील वस्तुस्थिती व त्यावर महानगरपालिका आयुक्त यांनी दिलेला निर्णय नमूद करावा. जर एखाद्या प्रकरणी आरक्षण निश्चित करताना चूक झाल्याचे आढळल्यास तात्काळ ती चूक सुधारण्याकरीता राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्यात यावी.

ई) अंतिम आरक्षणाची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणे :-

प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर विचार करुन त्यावर अंतिम निर्णय झाल्यानंतर **परिशिष्ट- १२** मधील नमुन्यात प्रभागनिहाय अंतिम आरक्षणाची अधिसूचना राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व त्याची एक प्रत राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविण्यात यावी.

५. सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्याकरीता सोबतच्या प्रपत्र- १ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यक्रम देण्यात येत आहे. संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी सदर कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्याचे कामकाज पार पाडून विहित कालावधीत आरक्षण अंतिम करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी) २८.१०.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
२. सर्व महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई वगळून)
३. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
४. आयोगातील सर्व कार्यासने
५. निवड नस्ती.

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४३/का-५, दि. २७/१०/२०२५ सोबतचे सहपत्र)

प्रपत्र-१

| अ.क्र | टप्पा | टप्पा सुरू / पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| | अ) प्रारुप आरक्षणास मान्यता घेणे | |
| १ | आरक्षित जागांची संख्या निश्चित करुन त्यास राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव सादर करणे | ३० ऑक्टोबर, २०२५ ते ०४ नोव्हेंबर, २०२५ |
| | ब) आरक्षण सोडत | |
| २ | आरक्षण सोडतीची जाहिर सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | ८ नोव्हेंबर, २०२५ |
| ३ | आरक्षणाची सोडत काढून सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करणे. | ११ नोव्हेंबर, २०२५ |
| | क) हरकती व सूचना | |
| ४ | प्रारुप आरक्षण, हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात प्रसिध्द करणे | १७ नोव्हेंबर, २०२५ |
| ५ | प्रारुप आरक्षण हरकती व सूचना मागविण्याचा अंतिम दिनांक | २४ नोव्हेंबर, २०२५ |
| | ड) अंतिम आरक्षण | |
| ६ | प्रारुप आरक्षणावर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी आदेशाच्या परिशिष्ट-११ मधील नमुन्यात निर्णय घेणे. | २५ नोव्हेंबर, २०२५ ते १ डिसेंबर, २०२५ |
| ७ | आयोगाच्या मान्यतेनंतर अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | २ डिसेंबर, २०२५ |

२७.१०.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र